# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०३/०५/२०२४

**आदर्श आचारसंहिता, मतदान केंद्र सुसज्जता बाबत मा.आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली पालिका मुख्यालयात बैठक संपन्न**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४, २२-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघात आदर्श आचारसंहिता, मतदान केंद्र सुसज्जता याबाबत २२-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघाचे आचार संहिता नोडल अधिकारी (प्रमुख) म्हणून मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ मे, २०२४ रोजी महानगरपालिका मुख्यालयात बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस मा.अति.आयुक्त (उत्तर/दक्षिण), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, उप-आयुक्त, सहा.आयुक्त, कार्यकारी अभियंता, विभागप्रमुख व इतर कर्मचारी उपस्थित होते.

२२-पालघर (अ.ज.) लोकसभा मतदार संघात आदर्श आचारसंहिता राबविण्यासाठी तसेच मतदान केंद्र सुसज्ज ठेवण्यासंबंधी विविध सूचना यावेळी मा.आयुक्त यांनी दिल्या. सध्यस्थितीत आपण निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यावर असून नामनिर्देशन पत्राची कार्यवाही सुरु झालेली असून पक्षांचे उमेदवारही अंतिम होतील व त्यानंतर प्रचाराला मोठ्या प्रमाणावर सुरुवात होणार असल्याने विविध तक्रारी, होर्डिंग, बॅनर बद्दलच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त होतील, या तक्रारींचे निवारण वेळेत होण्यासाठी करावयाच्या कार्यवाही बाबत मा.आयुक्त महोदयांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे निवडणूक काळात होर्डिंग, बॅनर, जाहिराती लावणे तसेच मैदानावर सभा घेणे बाबतच्या परवानग्या देणेसंबंधी करावयाची कार्यवाही, FST/ SST पथकांमार्फत करण्यात येणारी कारवाई, आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, अनधिकृतपणे होर्डींग्ज, बॅनर लावणाऱ्यांवर करण्यात येणाऱ्या कारवाईची कार्यपद्धती, तसेच निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती निवडणूक आयोग व इतर संबंधित विभागांना वेळोवेळी कळविणे इ. विविध बाबींवर चर्चा करून मा.आयुक्त महोदयांनी उपस्थित अधिकाऱ्यांना याबाबत मार्गदर्शन व निर्देशही दिले.

तसेच प्रामुख्याने. सर्व मतदान केंद्रांना अधिकाऱ्यांनी दोन दिवसांत प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील किरकोळ दुरुस्तीची कामे करून घेणे, मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, टेबल, खुर्च्या, मंडप, लाईट, पंखे, रॅम्प, शौचालय इ.व्यवस्था आहेत कि नाही याची पाहणी करून आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यात यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर वैद्यकीय टीम, व्हीलचेअर, पाळणाघर, मतदान कर्मचारी यांचे भोजन इ.व्यवस्थाही करण्यात यावी व सर्व मतदान केंद्र सुसज्ज ठेवण्याचे निर्देश यावेळी मा.आयुक्त यांनी दिले.

निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेचे आदेश यावेळी मा.आयुक्त महोदयांनी दिले.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**